# जाहिरात

महाराष्ट्र शासन
संसदीय कार्य विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
विस्तार इमारत, दालन क्र. एम -४, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२

**करार पद्धतीने नियुक्ती**

सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.सीबीई १५२५/प्र.क्र.३७/आस्थामं (का.१३), दि.१०.०६.२०२५ अन्वये विहित केलेल्या अटी व शर्तीची पूर्तता करणाऱ्या राज्य शासकीय सेवानिवृत्त अधिकारी यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी (एक पद उपसचिव संवर्गातील) घेण्याकरीता सेवानिवृत्त उपसचिव यांचे अर्ज मागविण्यात येत आहे.

**विवक्षित कामकाजाचे स्वरुप:-**

१. संसदीय कार्य विभागाचे कामाचे स्वरुप इतर मंत्रालयीन विभागांच्या कामापेक्षा भिन्न व विवक्षित स्वरुपाचे असून विधीमंडळाच्या अधिवेशनाच्या अनुषंगाने विधानमंडळ सचिवालय व मंत्रालयीन विभाग यात समन्वयाचे कामकाज हाताळणे.

२. विधिमंडळाच्या सभागृहांत अधिवेशन काळात शासनाच्यावतीने दिलेली आश्वासने निश्चित करून संबंधित मंत्रालयीन विभागांस पूर्ततेसाठी पाठविण्याची कार्यवाही करणे.

३. मंत्रालयीन विभागांकडून प्राप्त झालेली आश्वासन पूर्ततेची विवरणपत्रे आगामी विधिमंडळाच्या अधिवेशनात सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

४. विधिमंडळाच्या सदस्यांनी मांडलेल्या अशासकीय विधेयकावर विधि व न्याय विभागाचे अभिमत प्राप्त करणे व त्याअनुषंगाने पुढील कार्यवाहीसाठी महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय व मुख्यमंत्री सचिवालयास कळविणे.

५. तसेच विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सभागृहाच्या पटलावर कागदपत्रे ठेवणेबाबतच्या तदर्थ समित्यामार्फतच्या तसेच दोन्ही सभागृहातील शासकीय आश्वासन समितीच्या वेळोवेळी होणाऱ्या आढावा बैठकास उपस्थित राहून समीतीने दिलेले निर्देशांची नोंद घेऊन सर्व मंत्रालयीन विभागांना वेळोवेळी कळविणे व त्याची अंमलबजावणी करणे.

६. संसदीय आयुधांसमवेत आश्वासनेही ऑनलाईन करण्याबाबत कार्यवाही करणे.

७. महाराष्ट्र विधानमंडळाच्या अधिवेशनाशी संबंधित प्रलंबित बाबींच्या समन्वयाची कामे, ज्यामध्ये सर्व प्रशासकीय विभागांकडून माहिती मागविणे, आलेल्या माहितीचे संकलन करणे, वरिष्ठांच्या बैठकीत सादर करणे इत्यादी कामांचा समावेश आहे.

८. विधिमंडळातील व मंत्रालयातील सर्व समित्यांच्या बैठकांना उपस्थित राहणे व त्याअनुषंगाने कार्यवाही करणे.

९. महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिवेशन चालू होण्यापूर्वी मंत्रालयीन विभागातील सर्व विभागांना अधिवेशनाचे कामकाज सुरळीत हाताळण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करणे. तसेच संपूर्ण अधिवेशन कालावधीत उपस्थित राहून विभागातील अधिवेशनाच्या कामकाजावर नियंत्रण व देखरेख ठेवणे.

१०. विभागाचे अर्थसंकल्पीय कामकाज हाताळणे.

११. संसदीय कार्य विभागातील वरील कामे वेळेत पूर्ण होण्याच्यादृष्टीने विभागात व अन्य विभागात पाठपुरावा करुन सदर कामे पूर्ण करणे.

१२. राज्यपालांच्या अभिभाषणाचे प्रारुप तयार करणे.

**<u>करार पद्धतीने नियुक्तीच्या अटी व शर्ती :-</u>**

१. उपरोक्त पदांसाठी इच्छुक उमेदवार हे राज्य शासनाच्या मंत्रालयातील **<u>"उपसचिव"</u>** पदावरून सेवानिवृत्त झालेले असावे.

२. उमेदवाराला विधानमंडळ कामकाजाचे समन्वय व विधीमंडळाच्या सभागृहांत शासनाच्यावतीने दिलेल्या आश्वासनासंदर्भात सखोल ज्ञान व या कामाचा अनुभव असावा.

३. वरील विवक्षित कामाचा किमान तीन वर्षाचा अनुभव असावा.

४. उमेदवाराचे वय दि.०१.०२.२०२६ रोजी ६५ वर्षापेक्षा जास्त नसावे.

५. उमेदवारा विरुद्ध शासन सेवेत असताना कोणतीही शिस्तभंग विषयक कारवाई झालेली नसावी किंवा विभागीय चौकशीची कार्यवाही चालू अथवा प्रस्तावित नसावी.

६. उमेदवार मुंबई अथवा लगतच्या जिल्ह्यात राहणारा असावा.

७. उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे चांगले ज्ञान असावे.

८. आवश्यक अर्हता धारण करणाऱ्या इच्छुक उमेदवारांने सदर पदाकरीता विहित नमुन्यात अर्ज सादर करावा. सदर **<u>अर्ज सह सचिव, संसदीय कार्य विभाग, विस्तार इमारत, दालन क्र. एम-४, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२ यांच्याकडे दि. ९.०३.२०२६ पर्यंत सांय.४:३० वाजेपर्यंत व्यक्तीशः सादर करावे.</u>** विहित मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जावर कार्यवाही करण्यात येणार नाही. अशा अर्जासंदर्भात शासनाशी केलेल्या पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जांना उत्तर देण्यात येणार नाही.

९. यासंदर्भात **<u>दि. १०.०३.२०२६ रोजी सकाळी ११.०० वा. मुलाखत</u>** घेण्यात येईल. त्याअनुषंगाने मुलाखतीद्वारे पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल. उमेदवार निवडीबाबतचा संपूर्ण अधिकार विभागाचा राहील.

१०. नियुक्तीच्या कालावधीत सोपविलेले विविक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी उमेदवारावर राहील या आशयाचे बंधपत्र/हमीपत्र तसेच, सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय दि.१०.०६.२०२५ अन्वये विहित केलेल्या अटी व शर्ती मान्य असल्याबाबत तसेच, करारपद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींकडून नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करण्यात येणार नाही याबाबत बंधपत्र/हमीपत्र देणे बंधनकारक राहील.

११. उमेदवाराला सामान्य प्रशासन विभागाच्या दि.१०.०६.२०२५ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार, नियुक्तीच्यावेळी त्याला मिळत असलेल्या सेवानिवृत्ती वेतनाच्या आधारे मासिक पारिश्रमिकाची रक्कम निश्चित करण्यात येईल आणि ती नियुक्तीच्या कालावधीत कायम राहील.

१२. उमेदवारांची करार पद्धतीने देण्यात येणारी नियुक्ती एक वर्षासाठी राहील. तथापि, आवश्यकतेनुसार नियुक्तीस मुदतवाढ देण्याबाबत निर्णय घेण्यात येईल. मात्र, एकूण कालावधी तीन वर्षापेक्षा अधिक असणार नाही.

१३. इतर अटी व शर्ती सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्र.सीबीई १५२५/प्र.क्र.३७/आस्थामं (का.१३), दि.१०.०६.२०२५ रोजीच्या शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे राहतील.

**(प्र.बा.पवार)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**
**संसदीय कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.**

**दिनांक:- २६ फेब्रुवारी, २०२६**

# अर्जाचा नमुना

राज्य शासनाच्या उपसचिव संवर्गातून सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांची करार पध्दतीने नियुक्तीसाठी करावयाचा अर्ज.

पासपोर्ट फोटो

१) अर्जदाराचे संपूर्ण नांव :- ..........................................................................................

२) अर्जदाराचा पत्ता :- ..........................................................................................

३) सेवानिवृत्तीचा दिनांक व पदनाम :- ..........................................................................................

४) भ्रमणध्वनी क्रमांक :- ..........................................................................................

५) जन्म दिनांक व वय :- ..........................................................................................

६) विभागास आवश्यक अर्हता अर्जदाराकडे आहे काय? :- होय/नाही

७) शैक्षणिक अर्हता :- ..........................................................................................

८) अनुभवाचा तपशील :- ..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

प्रमाणित करण्यात येते की, उपरोक्त नमूद माहिती सत्य व अचूक असून निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अथवा नियुक्तीनंतर उपरोक्त माहितीपैकी कोणतीही माहिती असत्य / चुकीची असल्याचे निदर्शनास आल्यास माझी निवड कोणतीही पूर्वसूचना न देता रद्द करण्यास पात्र असल्याची आणि त्याबाबत कायदेशीर कारवाई होऊ शकते, याची मला पूर्ण जाणीव आहे.

करार (कंत्राटी) पदावरील नियुक्तीच्या सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत. सदर नियुक्ती पूर्णपणे कंत्राटी स्वरुपाची निव्वळ तात्पुरत्या स्वरुपातील नियुक्ती असल्याची मला जाणीव असून सदर नियुक्तीमुळे शासनातील कोणत्याही पदावर माझा धारणाधिकार हक्क निर्माण होत नाही.

एक वर्षाच्या कालावधीसाठी करार पध्दतीने सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याबाबतची जाहिरात/ सूचना मी काळजीपूर्वक वाचली असून, सदर जाहिरातीत / सूचनेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

**ठिकाण :-**

**दिनांक :-**

**अर्जदाराची स्वाक्षरी**